# पोलीस आयुक्तालय, अमरावती शहर

## दैनंदीन गुन्हे –दि.१९/०२/२०२३

खुन :–

| अ.क्र. | पो.ठाणे गु.र. नं. व कलम | धटनास्थळ | गुन्हा घडला ता.वेळ माहीती ता वेळ गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | आरोपीचे नांव व पत्ता | गुन्हयाची थोडक्यात हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | वलगाव ७१/२०२३ कलम ३०२, ३२६,५०४ ,३४ भादवि. | पो.स्टे. वलगांव हद्दीत | दि.१९/०२/२०२३ चे ११/०० वा. माहिती दि.१९/०२/२०२३ चे ११/३० वा. दाखल १९/०२/२०२३ चे १५/४५ वा. | एक महिला | १) रामदार परसरामजी सरोदे वय ६५ वर्ष<br>२) संदिप रामदार सरोदे वय ३० वर्ष दोन्ही रा.ग्राम रामा.ता.भातकुली.जि.अम . | हकिकत आशा प्रकारे आहे कि,नमुद घटना ता.वेळी व ठीकानी नमुद घटना ता.वेळी व ठीकानी यातील फिर्यादी हे दि.१९/०२/२०२३ रोजी सकाळी ११/०० वा.दरम्यान फिर्यादी व फि.चे पती (मृतक ) असे फिर्यादिच्या आईच्या गावी जाण्या करीता निघाले असता.तेथे जाण्या करीता मी आमचे घराचे बाहेर उभी होते.व माझे पती दुचाकी घरासमोर पलटवत होते. त्या मुळे रामदास सरोदे हे त्याचे घरा समोर कुंड गाडण्या करीता सबलने खडा करत होते. माझी लहान मुलगी हिच्या कडे रामदास घुरुन पाहत होते. मी त्याना तुम्ही माझ्या मुली कडे का घुरुन पाहतात.व पतिने देखील तुम्ही रागाने असे का पाहता.असे म्हटले असता.र ामदास परसरामजी सरोदे वय ६५ वर्ष रा.ग्राम रामा ता.भातकुली.जि.अमरावती.यांने त्याचे हातातील सबलीने माझ्या पतीला शिवीगाळ करुन डोक्यात मागच्या बाजुला सबल मारली त्यामुळे माझे पती गाडी वरुन खाली रोड वर पडले मी माझ्या मुलीला बाजुला केले. व रामदास सरोदे यांना अडविण्याची प्रयत्न केला.तर त्यांनी मला देखील हातावर सबल मारली .त्यामुळे मी बाजूला झाले.माझे पती खाली पडलेले असतांना.त्यांच्या डोक्यावर रामदास यांनी आणखी १० ते १२ वेळा सबल मारल्या मी जोरात ओरडले असता.रामदास सरोदे यांची पत्नी हि घरा बाहेर आली. माझे पती रस्त्यावर च खाली पडले होते.त्याचे डोक्यातुन खुप रक्त वाहत होते.मुख्य रस्त्या कडुन थोड्या वेळात एक महिला व तिचा मुलगो हे तिथे आले.संदिप ने रामदास याचे हातातील सबल घेतली व माझे पतीस च्या डोक्यात ०२ वेळा मारली त्यांनंतर रामदास सरोदे व त्यांचा मुलगा संदिप सरोदे हे तेथुन पळुन गेले.मी माझे पतीला उठविण्याचा प्रयत्न केला.परंतु ते उठले नाही. गावातील लोक यांनी माझे पतीला सावलीत बाजुला घेतले.त्यावेळी त्याचा श्वास चालु होता.व ऑंब्लुलंन्सला बोलाविले.लगेच पोलीस तेथे आले.व त्यानी माझे पतीला जिल्हा सा.रुग्नालयात अमरावती येथे नेले.असता.तेथे डॉं.सा.यांनी त्याना मृत्य घोषीत केले.अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट वरुन व व.पो.नि.सा.आदेशाने सदर चा गुन्हा दाखल |

दुखापत :–

| अ.क्र. | पो.ठाणे गु.र. नं. व कलम | धटनास्थळ | गुन्हा घडला ता.वेळ माहीती ता वेळ गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | आरोपीचे नांव व पत्ता | गुन्हयाची थोडक्यात हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| | पोस्टे गाडग्गो नगर अमरावती अपक्र २३१/२०२३ कलम ३२४ भादवी | वाघमारे यांच्या घरी भाड्याने प्रगती शाळेजवळ शेगाव अमरावती | दि १८.२.२०२३ रोजी १९.०० वा दि १९.२.२०२३चे ००.१३ वा | बाबुराव पुर्णाजी राउत वय ७४ वर्षा रा वाघमारे यांच्या घरी भाड्याने प्रगती शाळेजवळ शेगाव अमरावती | अनिल वसंतराव सावळकर रा अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की नमुद घ ता वेळी व ठीकानी यातील फिर्यादी हे कामावरुन घरी आले व फिर्यादी यांनी आरोपी यांना त्याच्या मुलीचे डिलेव्हरी करिता पैसे उधार दिले होते त्या पैसाची मागणी आरोपी यांना केली असता आरोपीने तोंडावर व पाठीवर मारुन तोंडावर जखम केली व रक्तबबाळ केले व फि यांना दगड मारुन जखमी केले. अशा फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन सदर चा गुन्हा दाखल |

जबरी चोरी :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिति ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | पोस्टे गाडग्गो नगर अमरावती अपक्र २३२/२०२३ कलम ४५२,३९४ भादवी | रमाबाई आंबेडकर नगर अमरावती | दि १८.२.२०२३ रोजी ११.०० वा दि १९.२.२०२३चे ०३.२८ वा | हरिदास अंकुश शिरसाठ वय ७२ वर्ष रा रमाबाई आंबेडकर नगर अमरावती मोक्र | १.गौरव गौतम वानखडे २. सज्जन काळे ३.विशाल कैलास भगत ४. अमित गौतम वानखडे रा रमाबाई आंबेडकर नगर अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की नमुद घ ता वेळी व ठीकानी यातील फिर्यादी हे दुकानात हजर असतांना यातील नमुद आरोपी हे फिर्यादी यांचे दुकानात जाऊन पोगा पंडीत व आलु चिप्स चे पाकीट मागितले ते फिर्यादी यांनी वरील सामान देऊन पैसे मागितले असता आरोपी यांनी पैसे नाही व आम्ही पैसे देत नाही असे म्हटल्याने फिर्यादी यांनी पैसे नाही तर मी सामान देणार नाही असे म्हटल्याने आरोपी फिर्यादी व त्याच्या मुलगा याला व फिर्यादी यांना मारहान केली फिर्यादी यांचे उजव्या डोळ्याचे वर व खाली जखम झाली असुन हातापायाला मुकामार असुन फिर्यादी मुलगा याला डोक्याला जखम असुन हातापायाला मुका मार आहे े.व त्याला लागली काठीने मारहान केली व आरोपी क्र १ व २ यांनी दुकानात जावुन २४०० ते २५०० रु गल्यातुन काढुन दुकानातील चिल्लर पैसे व चाकलेट फेकुन फिर्यादी व फिर्यादीचे मुलाला मारहान केली.अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरुना सदर चा गुन्हा दाखल |

विश्वासघात :—

| अ.क्र. | पो.ठाणे गु.र. नं. व कलम | धटनास्थळ | गुन्हा घडला ता.वेळ माहीती ता वेळ गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | आरोपीचे नांव व पत्ता | गुन्हयाची थोडक्यात हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | पोस्टे गाडगे नगर अमरावती अपक्र २३२/२०२३ कलम ४२० भादवी सहकलम ६६(क) आयटी अॅक्ट | ओम शिव निकेतन कालनी अमरावती | दि २९.१०.२०२२ रोजी १२.०० वा दि १९.२.२०२३च १५.५५ वा | त्रंबक रामभाऊ नागपुरे वय ४८ वर्ष रा शिवनिकेतन कालनी अमरावती | मो नं चा धारक | हकीकत अशा प्रकारे आहे की नमुन घ ता वेळी व ठीकानी यातील फिर्यादीस मो नं चा धारका क़डुन फोन आला व फिर्यादीस म्हटले की ते क्रेडीट कार्ड इनकायरी मधुन बोलत आहेत अशी खोटी बतावनी केली.करिता क्रेडिट कार्डची संपुर्ण माहीती नमुद मोबाईल धारकास दिली .नमुद मोबाईल धारकाने फिर्यादीच्या खात्यामधुन आनला लाईन ४४७४८ रु काढुन घेवुन फिर्यादीची आनलाईन फसवणुक केली. करिता फिर्यादीने सदरची तक्रार सायबर पोलिस स्टेशन ,पोलिस आयुक्तालय अमरावती शहर येथे होती.तक्रारीची चौकशी अंती वरिष्ठ पोलिस निरीक्षक यांचे आदेशाने मोबाईल क्र च्या धारका विरुदध तसेच फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरून सदर चा गुन्हा दाखल |

अपघात :—

| अ.क्र. | पो.ठाणे गु.र. नं. व कलम | धटनास्थळ | गुन्हा घडला ता.वेळ माहीती ता वेळ गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | आरोपीचे नांव व पत्ता | गुन्हयाची थोडक्यात हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | पोस्टे राजापेठ अप क्र. १७७/२०२३ कलम २७९,३३७ भादंवि सहकलम १३४, १८४ मो.वा.का.१९८८ | गॅलरी वाईन समोर नवाथे चौक अमरावती | दि. १८/०२/२३ चे १७/३०वा दा.ता. वेळ दि. १९/०२/२३ चे १४-१५ वा | प्रविण बाबाराव चौधरी वय ३५ वर्ष व्यवसाय मजुरी रा. हनुमान मंदिरासमोर सातुर्णा अमरावती | चारचाकी वाहन क्र. MH २७ BE ०३३२ पांढ-या रंगाची Varma कंपनीची गाडीचा चालक | हकिकत अशा प्रकारे आहे की यातील नमुद घ.ता.वेळी व ठिकाणी फिर्यादीची आई व घराशेजारी राहणारी एक महिला अशा दोघी घटनास्थळावरून पायी जात असतांना चारचाकी वाहन क्र. MH २७ BE ०३३२ पांढ-या रंगाची Varma कंपनीची गाडीच्या चालकाने आपली गाडी भरधाव वेगाने व लापरवाहिने चालवुन फिर्यादीची आई व सोबतची महिला हिला ठोस मारून पळुन गेली त्यामुळे फिर्यादीचे आईला पाठीला व डोक्याला मार लागला व सोबतची महिला हिला मुका मार लागला आहे. अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २ | पोस्टे राजापेठ अप क्र. १७६/२०२३ कलम २७९ भादंवि | दस्तुर नगर चौक जुना बायपासअमरावती | दि. १८/०२/२३ चे २१/३०वा दा.ता. वेळ दि. १९/०२/२३ चे ०१-३८ वा | सरतर्फे ASI प्रकाश जगताप ब.नं. ७८६, पो.स्टे. राजापेठ अमरावती | अविनाश उर्फ प्रतिक सुनिल पाटील वय ३० वर्ष रा. ग्राम पिंपळगाव सराईत ता. जि. बुलढाणा | हकिकत अशा प्रकारे आहे की यातील नमुद वाहन चालक आरोपी ने त्याचे ताब्यातील वाहन क्र. MH १४ KA ६५३९ बोलेरो पिकअप व्हॅन भरधाव वेगाने व लापरवाहिने चालवुन रोडचे मध्ये असलेल्या डिवायडरला धडक दिली व वाहतुकीस अडथळा केला. त्याचे कृत्य कलम २७९ भा.द.वि. प्रमाणे होत असल्याने सदरचा गुन्हा दाखल |
| ३ | पोस्टे राजापेठ अप क्र. १७८/२०२३ कलम २७९ भादंवि सहकलम १८४ मो.वा. का. १९८८ | समर्थ शाळे समोरील बडनेरा ते राजकमल कडे जाणा-या सार्वजनिक रोडवर अमरावती | दि. १९/०२/२३ चे १३/३०वा दा.ता. वेळ दि. १९/०२/२३ चे १५-४३ वा | सरतर्फे परि पोउपनि सागर ठाकरे , पो.स्टे. राजापेठ अमरावती मो.नं. ७५८८०८५६३६ | विकास विजयराव भुयार वय ३४ वर्ष रा. नवसारी अमरावती (ट्रॅक्टर क्र. MH २७ L ७४०२ चा चालक ) | हकिकत अशा प्रकारे आहे की यातील फिर्यादी यांची पो.स्टे. ला ड्युटी ऑफीसर ड्युटी असतांना मिळालेल्या माहितीवरून नमुद घटनास्थळी गेले असता यातील नमुद आरोपीने आपल्या ताब्यातील ट्रॅक्टर क्र. MH २७ L ७४०२ च्या ट्रॉलीमध्ये अंदाजे २० फुट उंचीचा छत्रपती शिवाजी महाराज ंचा पुतळा घेवुन नवसारी येथे जात असतांना समर्थ शाळे समोरील सार्वजनिक रोडवर आपल्या ताब्यातील ट्रॅक्टर ट्रॉलीसह पुतळा असलेला ट्रॅक्टर भरधाव वेगाने जात असतांना शिवाजी महाराजांच्या प्रतिमेच्या वरील लोखंडी रॉड हा रोडवरील इलेक्ट्रीक लाईनला टच होवुन ट्रॅक्टरचे समोरील टायरनी पेट घेतला. त्यामुळे ट्रॅक्टरमध्ये पुतळयाच्या संरक्षणाकरीता बसलेल्या ०४ मुलांचा जिवीतास धोका निर्माण केला आहे. असे नमुद आरोपीचे कृत्य कलम २७९ भा.द.वि. सहकलम १८४ मो.वा.का. १९८८ प्रमाणे होत असल्याने यातील सरकार तर्फे कायदेशीर फिर्याद दिल्यावरून सदरचा गुन्हा दाखल |

इतर :—

| अ.क्र. | पो.ठाणे गु.र. नं. व कलम | धटनास्थळ | गुन्हा घडला ता.वेळ माहीती ता वेळ गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | आरोपीचे नांव व पत्ता | गुन्हयाची थोडक्यात हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १२ |
| १ | पोस्टे बडनेरा अप.क्र.१३८/२०२३ कलम ४३५ भा.दं.वि. | वळगाव झिरे धावळे यांचे शेतात | घटना ता.वेळ - दि.१८.०२.२०२३ चे २२.०० वा. माहिती ता.वेळ - दि.१९.०२.२०२३ चे ००.२५ वा. दाखल ता.वेळ - दि.१९.०२.२०२३ चे ०१.१७ वा. | दिनेश मारोती मात्रे वय- ३२ वर्ष रा. वडगाव झिरे ता.जि.अमरावती | अज्ञात | हकिकत अशा प्रकारे आहे की,यातील फिर्यादी यांचे काका किसनराव गोविंदराव मात्रे वय- ५० वर्ष यांनी त्यांचे शेती मध्ये तुर पेरली होती गेल्या आठ ते दहा दिवसापुर्वी त्यांनी सात एकरामधील तुर सोगुन सोगलेली तुरिचे पेढ्या वाढविण्याकरिता गावालगत धावळे यांच्या शेतात गंजी लावुन ठेवली होती. नमुद घटना ता.वेळी व ठिकाणी धावळे यांचे शेतातुन आगीचा धुर व तुर जळाल्याचे दिसल्याने तेथे जावुन पाहिले असता फि.चे काका यांनी सोगुन ठेवलेली तुरीचे गंजी जळतांना दिसली त्यामुळे फि.व गावातील लोकांनी पाण्याने विझविण्याचा प्रयत्न केला परंतु गंजी पुर्णपणे जळुन राख झाली होती. त्या तुरीची कि.अं.८०,०००/- रु. आहे. कोणीतरी अज्ञात इसमाने जळतोळपणाने फि.चे काका ची तुर जाळुन नुकसान केले. फि.चे काका बाहेरगावी सोईरिक संबंधी गेले असल्याने फि.यांनी रिपोर्ट दिला अशा जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्ह दाखल |

अकस्मात मृत्यु :—

| अ.क्र. | पो.ठाणे मर्ग.क्र. व कलम | घटना स्थळ | मृतकाचे नांव | फिर्यादी | मरणाचे कारण | अकस्मात मृत्यूचे विवरण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | नांदगावपेठ मर्ग क्र ०७/२०२३ कलम १७४ जा.फौ. | बोरगाव धर्माळे | राजु पतेती | संजय रामकृष्ण मरोडकर वय ४२ वर्ष रा.लघुवेतन कॉलनी अमरावती | गळफास घेतल्याने मृत्यु | हकिकत अशा प्रकारे आहे की यातील फि यांचे शेतात गोटफॉर्म तयार केले असुन त्यावर सरजु पतेती हा चौकीदार म्हणुन काम करत होता.घ ता वेळी व ठिकाणी फि हे त्यांची पत्नी ,मुलगी व भाचा यांच्या सह त्याचे शेतातील गोटफार्म व भेट देण्यास गेले असता यातील मृतक याचे पत्नीने सांगीतले की आज सकाळी १०/३० वा दरम्याने माझे पती दारु पिवुन आला व आमचे भांडण झाले.मी बकऱ्या चारण्यासाठी शेतात निघुन गेली व बकऱ्या चारुन घरी परत आली असता माझे पती याने बकऱ्या बाधत असलेल्या गोठ्यामध्ये गळफास घेतला व माझे पती ला मी स्वतहा गळफास |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | वरुन खाली उतरविले व पाणी पाजले परंतु माझे पती मरण पावल्याने दिसुन आले. यावरुन माहीती फि यांना दिली.व यातील फि यांनी अँम्बुलन्स बोलाविली व माझे पती यांना आम्ही अँम्बुलन्स मध्ये टाकुन इर्वीन दवाखाना येथे घेवुन गेलो.अशा फिर्यादी यांचे जबानी रि वरुन सदरचा गुन्हा दाखल |

## प्रोव्हीशन

| अ. क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| | पो स्टे फ्रेजरपुरा अमरावती शहर | अप क्र.१४४/२०२३ कलम ६५(ई)म.दा.का | परिहारपुरा वडाळी अमरावती | दी.१९.०२.२०२३ चे ११.३५ वा | दी.१९.०२.२०२३ चे १३.१३ वा | सरतर्फे पो.हे.कॉ. योगेश सुंदरलाल श्रीवास, वय ५३ वर्ष, ब.नं.१०१५ पो.स्टे. फ्रेजरपुरा अमरावती शहर | मनोज मोहन बेनिवाल, वय ४६ वर्ष,रा. परिहारपुरा वडाळी,अमरावती | हकिकत अशा प्रकारे आहे की, यातील नमुद फिर्यादी हे मा. व.पो.नि.सा.यांचे आदेशाने पो.स्टे. फ्रेजरपुरा हद्दित डी.बी.पथकातील कर्मचारी सह पेट्रोलींग करित असता गुप्त बातमीदारा कडुन खात्री लायक खबर मिळाल्या वरुन नमुद घ.ता.वेळी व ठिकणी आरोपी इसम यांचे वर प्रो.रेड केली असता पंचासमक्ष त्याचे ताब्यातुन एक लहान व एक मोठी प्लास्टीकच्या डबकीत १३ लिटर गावठी हा.भ.दारु किं.अं.२६००/-रु. चा प्रोव्ही.माल जप्त करण्यात आला नमुद आरोपी याचे हे कृत्य कलम ६५(ई) म.दा.का. प्रमाणे होतअसल्याने त्याचे विरुध्द सदरचा गुन्हा दाखल |
| | नांदगावपेठ अप क्र ७२/२०२३ कलम ६५ (ई) म.दा.का | | पो.स्टे. नांदगांवपेठ हद्दीत | दि.१९/०२/२०२३ चे ०८/५० वा. | दि.१८/०२/२०२३ चे ११/०५ वा. | सरतर्फे पोउपनि गणेश राऊत रा.पोस्टे नांदगावपेठ | एक महिला | हकीकत अशा प्रकारे आहे की घ ता वेळी व ठिकाणी गुप्त बातमीदाराकडुन माहीती मिळाली की एक महीला सार्वजनीक ठिकाणी अवैद्यरित्या विनापरवाणा देशी दारुची विक्री करीत आहे. .वरुन आम्ही मिळालेल्या खबरेप्रमाणे गेलो असता आम्हाला महीला जागीच मिळुन आले.तिला मपोका विणा ब न १०१० यांनी ताब्यात घेवुन तिचे नाव गाव विचारले असता तिने तिचे नाव सांगितले तिच्या ताब्यातुन २ खाकी रंगाच्या बॉक्समध्ये १८० एम एल च्या बॉबी संत्रा देशी दारु च्या पावट्या प्रती बॉक्समध्ये ४८ नग असा एकुण ९६ पावट्या प्रती पावटी कि ८० रु.प्रमाणे एकुण ७६८० रु.चा माल माल मिळुन आला.मिळुन आलेल्या मालापैकी एका १८० एम`एल काचेच्या शिशीमध्ये वेगळा काढुन पंचासमक्ष सि ए सॅंम्पल करीता वेगळी काढुन त्यावर पंचाचे व आमचे सहीचे कागदी लेब लावुन लाखेचे जागीच सिल केले.अशा फिर्यादी यांचे लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |